तात्काळ / कालमर्यादित

जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०१५/4688
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- १७ / ०६ /२०१५.

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद (सर्व)

२) शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका
शिक्षण मंडळ दादर मुंबई

३) शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई
दक्षिण/पश्चिम/उत्तर विभाग

**विषय :- पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा मार्च २०१५ गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीबाबत...**

**संदर्भ :- या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती /२०१५/४६३९ दि १५/०६/२०१५चे पत्र.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार दिनांक २२ मार्च २०१५ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल दिनांक ३०मे २०१५ रोजी, दुपारी ०१.०० वाजता www.msshss.in व www.mscepune.in या परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

पालकांनी शाळेमार्फत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांत (दिनांक १५ जून २०१५ अखेरपर्यंत) गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्याबाबत अर्ज परिषदेच्या msshss.msce@gmail.com किंवा mscepune@gmail.com या ई-मेल आयडी वर किंवा टपालाद्वारे पाठविण्याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

सदर परीक्षेची गुणपडताळणी व छायांकित प्रतीच्या मागणीसाठी दि १५ जून २०१५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. काही तांत्रिक अडचणीमुळे परिषदेचे ई-मेल आयडी उपलब्ध होत नाहीत. अशा तक्रारी आल्यामुळे अनेक शाळांनी गुणपडताळणी व छायांकित प्रतीचे अर्ज करता आले नाहीत. त्यामुळे शाळेच्या व पालकांच्या मागणीनुसार अर्ज करण्याची मुदत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये दिनांक २० जून २०१५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. गुणपडताळणी व छायांकीत प्रती मिळण्यासाठीचा नमुना अर्ज व चलनाचा नमुना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मुख्याध्यापक व पालकांना सूचीत करण्यात येते की, सदरच्या संकेतस्थळावर गुणपडताळणी व छायांकीत प्रतीचा अर्ज आणि भारतीय स्टेट बँकेच्या चलनाची प्रत प्रिंट काढून चलनाद्वारे रक्कम बँकेत भरावी. व सदरचा फॉर्म पूर्ण भरुन टपालाद्वारे किंवा हस्तपोच या कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत.

आपल्या जिल्ह्यातील सर्व पालक, शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या माहितीसाठी विहित मुदतीत गुणपडताळणी व छायांकितप्रतीचे अर्ज टपालाद्वारे किंवा हस्तपोच पाठविण्याबाबतचे निवेदन स्थानिक जिल्हा वृत्तपत्रात विनामूल्य (नि:शुल्क) प्रसिद्धीस द्यावे.

**(व्ही. बी. पायमल)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

**प्रत माहितीस्तव सादर :-**

१. मा आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. संचालक (माध्यमिक), पुणे - ०१.
३. मा. संचालक (प्राथमिक), पुणे - ०१.